CMYK

कामक्षा देवी माध्यमिक विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा >>पान 2

ग्रामदेवता बालाजीचे दर्शन घेऊन महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचाराला प्रारंभ >>पान 3

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४; मतदारांनी निर्भयपणे मतदानाचे हक्क बजाविण्याचे आवाहन >>पान 4

सुविचार
वाया घालवलेला वेळ आपलं भविष्य बिघडवत असतं.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



२९ वर्षांनंतर, भूल भुलैया ३ द्वारे माधुरी दीक्षितची संपणार प्रतीक्षा, तिला मिळेल तिच्या करिअरमधील ५ वा ब्लॉकबस्टर चित्रपट? आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 88 ■ बुधवार, दि. 06 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## कॉमेडी किंग अजितदादांचा प्रचार करणार, सयाजी शिंदेंनंतर भाऊ कदमांची राष्ट्रवादीच्या घड्याळाला साथ



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी:** आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात प्रचंड चुरस रंगल्याचं पाहायला मिळत आहे. अशातच आता प्रत्येक पक्षानं प्रचाराचा धुरळा उडवला आहे. भव्य रॅली, जाहीर सभा यांसारखे अनेक फंडे राजकीय पक्ष प्रचारासाठी वापरत असल्याचं पाहायला मिळत आहे. अशातच अनेक सेलिब्रिटीदेखील अनेक राजकीय पक्षांचा प्रचार करताना पाहायला मिळत आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अभिनेते सयाजी शिंदे यांनी प्रवेश केला असून आता पक्षाच्या प्रचाराची धुरादेखील ते सांभाळताना दिसणार आहेत. अशातच, सयाजी शिंदेंपाठोपाठ आता प्रसिद्ध कॉमेडी किंग भाऊ कदम देखील अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा प्रचार करताना दिसणार आहे.

लोकांना खळखळवून हसवणारे कॉमेडी किंग भाऊ कदम अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रचार करताना दिसणार आहेत. सयाजी शिंदे यांच्यानंतर आणखी एक सेलिब्रिटी अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या प्रचारात दिसणार आहे. अजित पवारांची लाडकी बहीण योजना यासह विविध योजनांची माहिती भाऊ कदम प्रचार रॅलीत सहभागी होऊन सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणार असल्याची माहिती मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून राज्यभरात भाऊ कदम यांच्या प्रचार रॅलीच आयोजन केलं जाणार आहे.

# विधानसभा निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज

## ४ हजार १४० अंतिम उमेदवार- मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम

**मुंबई / प्रतिनिधी:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक सन २०२४ साठी राज्यातील एकूण २८८ विधानसभा मतदारसंघासाठी एका टप्प्यांमध्ये दिनांक २० नोव्हेंबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी यंत्रणेची सर्व तयारी पूर्ण झाली असून या निवडणुकीतील अंतिम उमेदवारांची संख्या ४ हजार १४० असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस.चोक्कलिंगम यांनी आज दिली.

मंत्रालय व विधीमंडळ वार्ताहर संघाच्या पत्रकार कक्षात आयोजित पत्रकार परिषदेत श्री.चोक्कलिंगम बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी पी.प्रदीप उपस्थित होते.

श्री.चोक्कलिंगम यांनी सांगितले की, राज्यातील लोकसभेच्या १६ - नांदेड या एका लोकसभा मतदारसंघात सुद्धा दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी पोटनिवडणूक घेण्यात येणार आहे. राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी नामनिर्देशनपत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ असा होता. त्यानुसार २८८ विधानसभा मतदारसंघासाठी एकूण ७,०७८ इतके नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले. त्यापैकी एकूण २,९३८ अर्ज मागे घेण्यात आले.



**मतदार नोंदणीत वाढ**

दि.३० ऑक्टोबर रोजी अद्ययावत मतदारांची संख्या ९,७०,२५,११९ असून यामध्ये पुरुष मतदार ५,००,२२,७३९ तर महिला मतदार ४,६९,९६,२७९ आहे. तर ६,१०१ तृतीयपंथी मतदारांची नोंदणी झाली आहे. दिव्यांग मतदारांची एकूण संख्या ६,४१,४२५ इतकी असून सेना दलातील मतदारांची संख्या १,१६,१७० आहे.

**राज्यामध्ये अतिउंच इमारती/सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या संकुलात १,१८१ मतदान केंद्रे**

मतदारांच्या संख्येच्या प्रमाणात मतदान केंद्राच्या संख्येत वाढ केली असून राज्यात एकूण मतदान केंद्रे १,००,१८६ आहेत. यामध्ये शहरी मतदान केंद्र ४२,६०४ तर ग्रामीण मतदान केंद्र ५७,५८२ इतकी आहेत. शहरी भागातील मतदारांची अनास्था विचारात घेऊन शहरी भागातील मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावे, यासाठी राज्यामध्ये पुणे, मुंबई, ठाणे, इ. शहरांमध्ये अतिउंच इमारती/सहकारी गृहनिर्माण संस्थांची संकुले यामध्ये एकूण १,१८१ मतदान केंद्र उभारण्यात आलेली आहेत. तसेच झोपडपट्टी भागात २१० मतदान केंद्र उभारण्यात आलेली आहेत. सहाय्यक मतदान केंद्रांची एकूण संख्या २४१ इतकी आहे.

**ईव्हीएम व्हीव्हीपॅट**

राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीसाठी पुरेशा संख्येने ईव्हीएम उपलब्ध असून पुरेसा साठा आहे. महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १,००,१८६ इतक्या मतदान केंद्रांसाठी २,२१,६०० बॅलेट युनिट (२२१ %), १,२१,८८६ कंट्रोल युनिट (१२२ %) व १,३२,०९४ व्हीव्हीपॅट (१३२ %) इतक्या प्रथमस्तरीय तपासणी मशिन्स उपलब्ध असून एकूण प्रथमस्तरीय करण्यात आलेल्या ईव्हीएम पैकी प्रशिक्षण व जनजागृतीच्या कार्यक्रमाकरिता त्यापैकी ५१६६ बॅलेट युनिट, ५१६६ कंट्रोल युनिट व ५१६५ व्हीव्हीपॅट इतक्या मशिन्सचा वापर करण्यात आला आहे. या सर्व बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व ईव्हीएम मशिन्सची प्रथम सरमिसळ दिनांक १८ ते २१ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत सर्व जिल्ह्यांकडून करण्यात आलेली आहे. या निवडणुकीत एकूण १८५ विधानसभा मतदारसंघात एक बॅलेट युनिटची आवश्यकता आहे. तर १०० मतदारसंघात दोन बॅलेट युनिट आणि तीन मतदारसंघांमध्ये तीन बॅलेट युनिट लागणार आहेत.

**विधानसभा निवडणुकीसाठी निरिक्षक**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघासाठी १४२ सामान्य निरीक्षक, ४१ पोलीस निरीक्षक व ७१ खर्च निरीक्षक यांची नियुक्ती केलेली आहे. तसेच विशेष पोलीस निरीक्षक दीपक मिश्रा, भापोसे. (से. नि.), विशेष खर्च निरीक्षक बी. आर. बालकृष्णन, व विशेष सामान्य निरीक्षक मोहन मिश्रा, भाप्रसे (से. नि.) यांची नियुक्ती केलेली आहे.

**कायदा व सुव्यवस्था अंतर्गत दि. ४ नोव्हेंबरपर्यंतचा तपशील**

राज्यातील वितरित केलेले एकूण शस्त्र परवाने ७८,२६७ इतके असून जमा करण्यात आलेली शस्त्रास्त्रे ५५,१३६ एवढी आहेत. जप्त करण्यात आलेली शस्त्रे २२९ तर परवाने रद्द करून जप्त करण्यात आलेली शस्त्रे ५७५ आहेत. परवाना जमा करण्यापासून सुट देण्यात आलेली शस्त्रे १०,६०३ इतकी असून जप्त करण्यात आलेली अवैध शस्त्रास्त्रे १,२९४ आहेत. राज्यात आचारसंहिता लागू झाल्यापासून ४६,६३० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

राज्यभर अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या जप्ती.

राज्यात दि. १५.१०.२०२४ ते दि. ०४.११.२०२४ या कालावधीत राज्यातील केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या बेकायदा पैसे, दारु, ड्रग्ज व मौल्यवान धातु इ. बाबींच्या एकुण - २५२.४२ कोटी रुपयांची जप्ती करण्यात आली आहे. यामध्ये रोख रक्कम - ६३.४७ कोटी तर ३४,८९,०८८ लिटर दारु ( ३३.७३ कोटी रुपये किमतीची) जप्त करण्यात आली. ड्रग्ज ३८,२४,४२२ ग्राम (३२.६७ कोटी रुपये किमतीचे.) मौल्यवान धातू १४,२८,९८३ ग्राम (८३.१२ कोटी रुपये किमतीचे ), तर फ्रिबीज ३४,६३४ (संख्या) २.७९ कोटी रुपये किमतीचे आणि इतर ८,७९,९१३ (संख्या) ३६.६२ कोटी रुपये किमतीचे जप्त करण्यात आले आहे.

**सी व्हिजील ॲप वरील आचारसंहिता भंगाबाबतच्या २,४५२ तक्रारी निकाली**

दि. १५.१०.२०२४ ते ०४.११.२०२४ या कालावधीत राज्यभरात सी व्हिजील ॲप वर आचारसंहिता भंगाबाबतच्या २,४६९ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यातील २,४५२ (९९.३१%) तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. तसेच आज अखेर एनजीएसपी पोर्टल वरील ७,७९३ तक्रारीपैकी ५,२०५ निकाली काढण्यात आलेल्या आहेत.

**माध्यम देखरेख व संनियत्रण समिती**

राजकीय पक्षामार्फत प्रचार प्रसिध्दीकरिता इलेक्ट्रॉनिक माध्यमांमार्फत दिल्या जाणाऱ्या जाहिरातीचे ऑडियो-व्हिडियो/संदेश यांचे पूर्व प्रमाणिकरण करण्यासाठी राज्यस्तरीय माध्यम प्रमाणिकरण समिती गठित करण्यात आली आहे. या समितीकडे जाहिरातीच्या पूर्व प्रमाणीकरणसाठी नोंदणीकृत राजकीय पक्षांकडून प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने ९० प्रमाणपत्राद्वारे ६२८ जाहिरातींना मान्यता देण्यात आलेली आहे.




## राज्यात ६ लाख ४१ हजार ४२५ दिव्यांग मतदार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी एकूण ६ लाख ४१ हजार ४२५ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. यामध्ये ३ लाख ८४ हजार ६९ पुरुष मतदार, २ लाख ५७ हजार ३१७ महिला दिव्यांग मतदार, तसेच ३९ तृतीयपंथी दिव्यांग मतदारांचा समावेश आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

पुणे जिल्ह्यात सर्वाधिक दिव्यांग मतदार आहेत. पुणे येथे ८८ हजार ९३७ दिव्यांग मतदार नोंदणीकृत आहेत. यामध्ये ४८ हजार ६२६ पुरुष, ४० हजार ३०१ महिला आणि १० तृतीयपंथी दिव्यांग मतदारांचा समावेश आहे. पुणे पाठोपाठ ठाणे जिल्ह्यात ३८ हजार १४९ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. यामध्ये २१ हजार ५७३ पुरुष मतदार, १६ हजार ५७३ महिला मतदार आणि ३ तृतीयपंथी दिव्यांग मतदार आहेत.

दिव्यांग मतदारांची सर्वात कमी नोंदणी गडचिरोली जिल्ह्यात आहे. येथे ६ हजार ४३ दिव्यांग मतदारांची नोंद आहे. यामध्ये ३ हजार ७१० पुरुष आणि २ हजार ३३३ महिला दिव्यांग मतदारांचा समावेश आहे.

राज्यात तृतीयपंथी दिव्यांग मतदारांची एकूण संख्या ३९ आहे. सर्वाधिक तृतीयपंथी दिव्यांग मतदार औरंगाबाद जिल्ह्यात आहेत. एकूण १२ तृतीयपंथी दिव्यांग मतदार आहेत. पुणे जिल्ह्यात १०, नांदेड जिल्ह्यात ६, ठाणे जिल्ह्यात ३, आणि पालघर व जळगाव जिल्ह्यात प्रत्येकी २ तृतीयपंथी दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. याशिवाय मुंबई उपनगर, लातूर, सोलापूर आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १ तृतीयपंथी दिव्यांग मतदार नोंदणीकृत आहेत.

## भाजपा नेत्या हिना गावित यांनी भाजपाला ठोकला रामराम

**नंदूरबार/प्रतिनिधी :** नंदुरबार विधानसभा निवडणुकीकरिता अपक्ष उमेदवार म्हणून उमेदवार अर्ज दाखल करणाऱ्या हिना गावित यांनी पुन्हा एकदा भाजपाला धक्का दिला. हिना गावित यांनी भाजपामधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्यांनी राजीनामा देण्याचं कारणही पत्रकार परिषदेत सांगितलं.

डॉ. हिना गावित यांनी म्हटले, ''लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे स्थानिक नेते महायुतीशी गद्दारी करीत आहेत. याबाबत मी भाजपाच्या आणि शिवसेनेच्या वरिष्ठांकडे तक्रारदेखील केली होती. मात्र, त्यांना न जुमानता नंदुरबार विधानसभा मतदार संघात शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांकडून काँग्रेस पक्षातील कार्यकर्त्याला भाजपा उमेदवारासमोर उभे केले. त्यामुळे मी अक्कलकुवा विधानसभा मतदार संघात अपक्ष उमेदवारी दाखल केली.''

हिना गावित यांचा शिवसेना नेत्यांवर आरोप- भाजपाच्या प्रवक्त्या हिना गावित यांनी म्हटले, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आदर्श मानून २०१४ पासून मी भाजपात कार्यरत झाले. लोकसेवा आणि राष्ट्रसेवा यांचे धडे घेत चांगले कार्य करू शकले. परंतु, आमच्या मित्रपक्षाकडून स्थानिक स्तरावर सातत्यानं मनोबल तोडण्याचं कार्य सुरू आहे. नंदुरबार जिल्ह्यातील महायुतीमधील भाजपाचे मित्र पक्ष सातत्यानं गावित परिवाराच्या विरोधात भूमिका घेऊन षडयंत्र रचत असतात. विशेषतः महाराष्ट्राच्या महायुतीमधील प्रमुख मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेचे जिल्हा नेते तथा माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी हे भाजपा विरोधातील प्रमुख काँग्रेस पक्षाला नेहमी शक्ती पुरवून अडचणी निर्माण करत असतात. नंदुरबार लोकसभा मतदारसंघात मला उमेदवारी मिळू नये, इथपासून मला पराभूत करण्यापर्यंत त्यांनी भूमिका बजावली. तरीही पक्षीय स्तरावरून त्यांना आवर घालण्यात आला नाही.''

चांगला हेतू ठेवून उमेदवारी मागितली- ''नंदुरबार विधानसभा मतदारसंघात उघडपणे काँग्रेस उमेदवारासाठी मनुष्यबळ देणे, धनशक्ती पुरवणे आणि जागोजागी बैठका घेऊन मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या पराभवासाठी तयारी चालवणं त्यांनी सुरू ठेवलं आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत अक्कलकुवा विधानसभा मतदारसंघातून जर मी निवडणूक लढवली तर भारतीय जनता पक्षाचा म्हणजे महायुतीचा एक आमदार वाढू शकतो. हा चांगला हेतू ठेवून मी उमेदवारी मागितली. तरीही शिवसेनेचे जिल्हा नेते चंद्रकांत रघुवंशी यांनी त्या जागेचा आग्रह धरला. त्या पक्षाचा उमेदवार उभा करण्याची खेळी केली,'' असा आरोप गावित यांनी केला. वरिष्ठांची अडचण होऊ नये, म्हणून... हिना गावित यांनी पक्षाचा राजीनामा देण्यामागं भूमिका स्पष्ट केली. त्या म्हणाल्या, '' सर्व राजकीय घटनाक्रम आपल्या आणि पक्षातील वरिष्ठांना वेळोवेळी निदर्शनास आणून दिल्या आहेत. तथापि या परिस्थितीत बदल झालेला नाही. त्यामुळे अक्कलकुवा विधानसभा मतदारसंघातून मी दाखल केलेली अपक्ष उमेदवारी करण्यावर ठाम राहणार आहे. परंतु भारतीय जनता पक्षाची जबाबदार सदस्य असताना माझ्या या भूमिकेमुळे महायुतीमधील वातावरण बिघडू शकते. घटक पक्षांमधील अंतर वाढण्याला मी कारणीभूत ठरू शकते. हे लक्षात आल्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या सदस्यत्वाचा आणि पदाचा राजीनामा दिला आहे. पक्षातून बाहेर पडताना मला विलक्षण दुःख आणि वेदना होत आहे.''




## दिवाळीनंतरही मुंबईतील हवेच्या गुणवत्तेत सुधारणा नाहीच!

### सलग पाच दिवसांच्या घसरणीमुळे अशुद्ध हवा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवाळीच्या दिवसांत झालेली फटाक्यांची आतषबाजी यामुळे मुंबईच्या हवेचा दर्जा पहिल्या दिवसापासून ढासळला होता. पहिल्याच दिवशी काही भागात अतिवाईट ते वाईट हवेची नोंद झाली. दरम्यान, दिवाळीनंतरही मुंबईतील हवेच्या गुणवत्तेत सुधारणा झालेली नाही. याउलट, सोमवारी मुंबईच्या हवेचा दर्जा मध्यम श्रेणीतच नोंदला गेला. सलग पाच दिवस शहरात हवेची गुणवत्ता खालावलेली आहे.

त्यामुळे, अशुद्ध हवेचा मुंबईकरांना सामना करावा लागणार आहे.

मागील काही दिवसांपासून मुंबईतील हवेची गुणवत्ता ढासळली असतानाच, दिवाळीच्या पहिल्याच दिवशी या हंगामातील हवा प्रदूषणाने उच्चांक गाठला. फटाक्यांचा धूर गुरुवारी सायंकाळपासून वाढल्याने मुंबईतील अनेक भागात धुरके पसरले होते. शिवडी, वांद्रे, कांदिवली या परिसरात अतिवाईट हवेची नोंद झाली होती. तर, इतर भागात ती वाईट ते मध्यम श्रेणीत नोंदली गेली. दिवाळीनंतर मुंबईच्या हवेत सुधारणा होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, सोमवारी मुंबईची हवा गुणवत्ता ह्यमध्यमह्न श्रेणीतच नोंदली गेली. मुंबईचा हवा निर्देशांक सोमवारी १५७ इतका होता. तसेच शिवडी, वांद्रे आणि मालाड या भागात वाईट हवेची नोंद झाली. दिवाळीच्या दिवसांत देखील याच भागातील हवेचा दर्जा सातत्याने खालावलेला होता. दरम्यान, यामध्ये सुधारणा होऊन सोमवारी येथील हवेचा दर्जा समाधानकारक किंवा मध्यम श्रेणीत नोंदला न जाता वाईट श्रेणीतच नोंदला गेला. येथील हवा निर्देशांक सायंकाळी सातच्या सुमारास अनुक्रमे २६३, २४३,२३५ इतका होता.

पावसाच्या काळात हवेची गुणवत्ता चांगली असते. मात्र, पावसाळा सरल्यानंतर धूलिकणांचे हवेतील प्रमाण वाढते. त्याशिवाय, फटाक्यांच्या आतषबाजीमुळेही हवेची गुणवत्ता खालावते. हवेच्या गुणवत्ता निकषानुसार, ५० पर्यंत निर्देशांक असल्यास हवेची गुणवत्ता चांगली, तर १०० पर्यंत समाधानकारक मानली जाते. दरम्यान, गुरुवारी सायंकाळपासून फटाक्यांची आतषबाजी सुरू झाली. शहराच्या



मध्यवर्ती भागासह उपनगरांमध्येही आतषबाजी करण्यात आली. मोठ्या माळा, आवाजी फटाक्यांसह शोभेच्या फटाक्यांचे प्रमाण जास्त होते. फटाक्यांमुळे हवेत मोठ्या प्रमाणात धूर पसरला होता. या आतषबाजीमुळे हवेच्या गुणवत्तेवर परिणाम झाला.

CMYK

## शहरे गुदमरली; श्वास कोंडला

सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही दिवाळीच्या दिवसात रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या फटाकेबाजीमुळे देशातील प्रमुख शहरांत रात्रीच्या वेळेत हवा प्रदूषणात प्रचंड वाढ झाल्याचे समोर आले आहे. शुक्रवार, शनिवार आणि रविवार या तिन्ही दिवशी दिल्लीसह देशातील प्रमुख शहरांच्या हवेचा निर्देशांक वाईट स्तरावर होता त्यामुळे आधीच प्रदूषित असलेली शहरांची हवा आणखी प्रदूषित झाली. वास्तविक फटाकेमुक्त, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा असे आव्हान अनेक सामाजिक आणि सेवाभावी संस्थांनी केले होते. शालेय शिक्षण विभागाने तर शालेय विद्यार्थ्यांना फटाके उडवणार नाही अशी शपथ दिली होती. न्यायालयाने फटाके उडविण्यास परवानगी दिली मात्र वेळेचे बंधन घातले या सगळ्या आव्हानांकडे नागरिकांनी दुर्लक्ष करत मनसोक्त फटाकेबाजी केली. वास्तविक फटाक्यांचे दुष्परिणाम सर्वांना माहीत आहे तरीही दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सरकारच्या आणि सेवाभावी संस्थांच्या आव्हानाला हरताळ फासत सर्वत्र फटाक्यांचा बेसुमार धूर काढण्यात आला त्याचा व्हायचा तो परिणाम झालाच. फटाक्यांमुळे अनेक शहरांची हवा प्रदूषित झाली विशेषतः दिल्ली, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या मोठ्या शहरातील हवेचे प्रदूषण चिंता वाटावी इतक्या गंभीर पातळीवर जाऊ लागले. जी शहरे कमी प्रदूषित शहर म्हणून गणली जात होती त्या शहरातही हवेचे प्रदूषण कमालीचे वाढल्याचे एका अहवालातून समोर आले आहे. मुंबई, पुण्याच्या तुलनेत ग्रामीण भागात कमी प्रदूषण असते मात्र यावेळी ग्रामीण भागातही प्रदूषण कमालीचे वाढले. ग्रामीण भागात पहिल्यांदाच इतके प्रदूषण दिसून आले. याला फटाकेच जबाबदार आहेत. दिवाळीत बेसुमार फटाकेबाजी करण्यात आली त्यामुळे चांगली हवा असलेले शहर अशी ओळख असलेल्या शहरांचीही प्रदूषित शहरात गणना झाली आहे अर्थात मुंबई, नवी मुंबई हेच शहरे नाही तर पुणे, नागपूर, औरंगाबाद यासारख्या शहरातही फटाक्यांच्या आतषबाजीने प्रदूषण वाढले आहे. केवळ राज्यातीलच नाही तर देशातीलही अनेक शहरात फटाक्यांमुळे प्रदूषण वाढले आहे. देशातीलच नव्हे तर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिल्ली शहरातील हवा या वर्षीही अती प्रदूषित श्रेणीत गणली गेली आहे. आपल्या राज्यासह देशात उत्सवाच्या नावाखाली लोकांनी मनमानी करत बेसुमार फटाक्यांची आतषबाजी केली त्यामुळेच दरवर्षीपेक्षा यावर्षी अधिक प्रमाणात फटाके उडवण्यात आले त्याच्याच परिणाम म्हणजे राज्यातील अनेक शहरे अतिप्रदुषित किंवा प्रदूषित श्रेणीत गणली गेली. सर्वोच्च न्यायालयाने ही यावर नाराजी व्यक्त करत दिल्ली व केंद्र सरकारला फटकारले आहे. अर्थात हवा प्रदूषित होण्यास केवळ फटाके हेच एकमेव कारण आहे असे नाही तर वाढती वाहने हे ही एक महत्वाचे कारण यामागे आहे मात्र दिवाळीत प्रदूषणाची पातळी खूप वाढते हे सत्य कोणीही नाकारू शकणार नाही आता हेच पहाणा गुरुवारी संध्याकाळी पुण्या – मुंबईच्या हवेची पातळी समाधानकारक या श्रेणीत होती ती अवघ्या चोवीस तासात वाईट या श्रेणीत पोहचली याचाच अर्थ बेसुमार फटाकेबाजीने हवा प्रदूषित झाली. हवा प्रदूषित झाल्याने शहरांचा जीव गुदमरला आणि नागरिकांचा श्र्वास कोंडला. दिवाळी नंतर अस्थमाच्या रुग्णांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. या दूषित हवेचा सर्वाधिक फटका लहानमुले, गरोदर महिला, वृद्ध नागरिक व व्याधीग्रस्त रुग्णांना बसला शिवाय फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी दुर्घटना घडल्याच्या बातम्याही आपण टीव्हीवर पाहिल्या. अनेक मुले फटाक्यांमुळे जखमी झाले तर काही ठिकाणी फटाक्यांमुळे आग लागून दुर्घटना घडल्या त्यात मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. हे सर्व टाळायचे असेल तर किमान पुढील वर्षांपासून तरी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करायला हवी. सरकारनेही फटाक्यांवर बंदी आणायला हवी आणि हो ही बंदी केवळ दिवाळी पुरतीच नको तर कायमस्वरूपी हवी कारण दिवाळी व्यतिरिक्त इतरवेळीही फटाके वाजवले जातात. दिवाळीत त्याचे प्रमाण अधिक असते इतकेच कदाचीत त्यामुळेच दिवाळीत फटाक्यांचे दुष्परिणाम तीव्रतेने दिसून येतात.

# कामक्षा देवी माध्यमिक विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा

## दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा कार्यक्रमध्ये संपन्न; तबब्ल १९ वर्षानंतर भेटले वर्गमित्र

दैनिक आपला विदर्भ

**किनगाव राजा/प्रतिनिधी :** कामक्षा देवी माध्यमिक विद्यालय किनगांव राजा याशाळेतील सन २००६ मधील इयत्ता दहावीचे शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा कार्यक्रम ता.४ नोव्हेंबर रोजी शाळेमध्ये संपन्न झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक भुजंगराव झोटे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक उद्धव दराडे,शिक्षक संजय केकान,रामदास सानप,प्रकाश सानप, गजानन मुंढे,गजानन थिगळे,संजय शेळके,संजय काळुसे,रामेश्र्वर हरकळ, गोपाल पवार आदीजण होते.मागील काळामध्ये अपघाती निधनांमध्ये तीन मित्रांचे निधन झाले त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.शाळेमध्ये शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी उद्योग,शिक्षण, सामाजिक,राजकीय,कृषी क्षेत्रामध्ये आपला आगळावेगळा ठसा उमटविला आहे. सर्व माजी विद्यार्थी एकत्र आल्यावर सर्वांनी आपल्या परिचय दिल्यावर त्यावेळी च्या काही गमतीदार काही चांगल्या आठवणीने उजाळा दिला वेगवेगळ्या क्षेत्रात काम करीत असताना जीवनात यश मिळवले असले तरी त्यामागे शाळेचे संस्कार आहे.




माजी विद्यार्थ्यांनीही आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शालेय जीवनामध्ये घडलेले विविध प्रसंग, आठवणींना उजाळा दिला तसेच तसेच सर्व शिक्षकांना सन्मानित केले.अनेक १९ वर्षानंतर एकत्र भेटत असल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष भुजंगराव झोटे यांच्यासह यावेळी विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक सत्यवती ढाकणे यांनी केले.यावेळी शिवानंद मुंढे,समाधान भोरजे, नरसिंग घुगे ,गणेश मुंढे समाधान मुंढे,अशोक मुंढे,गजानन कुटे,सतीश मुंढे, बाबासाहेब कुटे,कारभारी वाघ,सतीश ठोसरे, ज्ञानेश्र्वर जायभाये, रामप्रसाद सानप, अनिल डोईफोडे, अनिल सांगळे, विजय मुंढे,दीपक सोनुने,संदीप कुटे,संतोष झोरे, संजय नागरे,जगदीश वखरे ,प्रवीण बनसोडे ,ज्ञानेश्र्वर दुडीयार, गजानन झोरे, गजानन मिसाळ, पुंजाराम नागरे, संतोष नागरे, गणेश काकड ,गजानन मुंढे,रवींद्र केकान, सत्यवती ढाकणे, गीता मुंढे, आशा ढाकणे ,ज्योती खजुरे, योगिता केकान, कल्पना जायभाये, रेखा सोसे, रामकोर सोसे,विमल खजुरे, साधना काकड,अलका हरकळ, गीता कुटे,प्रफुल्ल गवई, गायत्री राजमाने, विद्या काळुसे, मनीषा सुतार, सत्यनारायण डोईफोडे, रामनाथ केकान, श्रीकांत काळुसे,गजानन काळुसे आदी जण उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानंद मुंढे यांनी केले तर आभार प्रदर्शन बाबासाहेब कुटे यांनी केले होते.

## शुक्रवारी मुखेड मतदारसंघ उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या अनुषंगाने ९१–मुखेड मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी शुक्रवारी ८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ५ या कालावधीत आयोजित केली आहे. या तपासणीसाठी उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा हिशोब खर्च निरीक्षकासमोर सादर करणे आवश्यक आहे. तहसील कार्यालय, मुखेड पहिला मजला येथे खर्च निरिक्षकांसमोर उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची तपासणी करण्यात येणार आहे. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम , १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणुकीच्या वेळेस प्रत्येक उमेदवार एकतर तो स्वत: किंवा त्याच्या, तीच्या निवडणूक प्रतिनिधीद्वारे त्याला, तीला नामनिर्देशित करण्यात आले आहे. त्या दिनांकापासून निवडणुकीच्या निकाल लागण्याच्या दिनांकापर्यत दोन्ही दिनांक धरुन, त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवणे आवश्यक आहे.

या तपासणीस अनुपस्थित राहणारे उमेदवार भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार कार्यवाहीस पात्र असतील तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब ठेवणे व दाखल करण्याच्या कायद्याच्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने कसूर केल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १० क अन्वये तो निवडणूक आयोगाकडून तीन वर्षाच्या कालावधीसाठी निरर्ह ठरविण्यास पात्र असेल यांची नोंद घ्यावी असे ९१–मुखेड विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनुप पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## २९ वर्षानंतर, भूल भुलैया ३ द्वारे माधुरी दीक्षितची संपणार प्रतीक्षा, तिला मिळेल तिच्या करिअरमधील ५ वा ब्लॉकबस्टर चित्रपट?

**मुंबई/प्रतिनिधी :** चित्रपटसृष्टीतील अत्यंत प्रतिष्ठित अभिनेत्री म्हणून माधुरी दीक्षितची ओळख आहे. देशातील सर्वोत्कृष्ट अभिनेत्रींच्या यादीत तिचे नाव समाविष्ट आहे. माधुरीने तिच्या करिअरमध्ये अनेक चित्रपट केले आहेत. तिच्या झोळीमध्ये अनेक सुपरहिट आहेत. जोपर्यंत ती चित्रपटसृष्टीत होती, तोपर्यंत ती निर्मात्यांची पहिली पसंती होती आणि आजही ती तिच्या वैयक्तिक आयुष्यासोबतच मनोरंजन जगताशीही जोडलेली आहे आणि अभिनयाच्या दुनियेतही हात आजमावत आहे. अभिनेत्रीने हे पुन्हा केले आहे. २०२४ मध्ये तिचा 'भूल भुलैया ३' हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. चित्रपटगृहांमध्येही याला चांगला प्रतिसाद मिळत आहे आणि यामुळे आशाही निर्माण झाली आहे कि २९ वर्षांनंतर इतिहासाची पुनरावृत्ती होईल.

माधुरी दीक्षितने १९८४ मध्ये तिच्या करिअरला सुरुवात केली होती. या काळात तिने अनेक हिट चित्रपटांमध्ये काम केले. काही सुपरहिटही होते. याशिवाय काही चित्रपट ब्लॉकबस्टर ठरले. राजा हा या चित्रपटांपैकी एक होता. या चित्रपटाने जबरदस्त कमाई केली होती. या चित्रपटात माधुरीसोबत संजय कपूर दिसला होता. राजा या चित्रपटाची आणखी एक खास गोष्ट म्हणजे या चित्रपटानंतर माधुरी दीक्षितचे अनेक चित्रपट आले आणि गेले, पण ब्लॉकबस्टर होऊ शकले नाहीत. अशा परिस्थितीत १९९५ मध्ये आलेला राजा हा माधुरीच्या करिअरमधील शेवटचा ब्लॉकबस्टर चित्रपट होता. आता २९ वर्षांनंतर माधुरीचा 'भूल भुलैया ३' हा चित्रपट आला आहे. या चित्रपटात तिची महत्त्वाची भूमिका आहे. या चित्रपटानेही चांगली कमाई केली आहे. अशा परिस्थितीत जर भूल भुलैया ३ ही कमाई चालू ठेवू शकला, तर माधुरीला तिच्या करिअरमध्ये आणखी एक ब्लॉकबस्टर मिळू शकेल.

बॉलीवूड अभिनेत्री माधुरी दीक्षितने तिच्या करिअरमध्ये दिलेला पहिला ब्लॉकबस्टर चित्रपट होता 'तेजाब'. हा चित्रपट १९८८ मध्ये आला होता.

# निवडणूक पारदर्शकता: राजकीय पक्षांचा सहभाग आणि महत्त्व

**डॉ.किरण कुलकर्णी,**
अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, सुलभ आणि योग्यरित्या पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाचे प्राधान्य आहे. या दृष्टिकोनातून निवडणूक यंत्रणा विविध टप्प्यांवर आवश्यक खबरदारी घेत आहे. मतदान प्रक्रियेत राजकीय पक्षांचा महत्त्वपूर्ण सहभाग असतो, कारण त्यांच्या उपस्थितीमुळे निवडणुकीतील पारदर्शकतेला अधिक बळ मिळते. म्हणूनच, विविध टप्प्यांवर राजकीय पक्षांचे उमेदवार आणि प्रतिनिधी यांना मतदान प्रक्रियेत सहभागी करून घेतले जाते.

मतदार यादीचे पुनरिक्षण

राज्यभरात मतदार यादीच्या संक्षिप्त पुनरिक्षणाची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली आहे. या प्रक्रियेत, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी संबंधित मतदान केंद्रांच्या मतदार यादीवर लक्ष ठेवतात, ज्यात नवीन मतदारांची नोंदणी, तसेच वगळलेली नावे यांची तपासणी केली जाते. यामध्ये, बुथ लेवल अधिकारी यांना मदत करण्यासाठी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी सक्रियपणे सहभागी होतात. जिल्हा निवडणूक अधिकारी आपल्या कार्यवाहीचे दस्तऐवजीकरण करून राजकीय पक्षांना आवश्यक माहिती देतात. राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील मान्यता प्राप्त राजकीय पक्षांचे स्थानिक प्रतिनिधी यांच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत बैठका घेतल्या जातात. सभेची सूचना राजकीय पक्षाच्या अधिकृत ईमेल आयडीवर त्यांना पाठविली जाते. या बैठकींना राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित राहुन शंका आणि अडचणी मांडतात. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत शंकांचे निरसन केले जाते. तसेच आवश्यकता भासल्यास भारत निवडणूक आयोगाकडे मार्गदर्शनासाठी पाठविले जाते.

ईव्हीएम प्रक्रिया

मतदान यंत्राबाबत ( ईव्हीएम ) प्रकियेमध्ये राजकीय पक्षांचा वेळोवेळी सहभाग आवश्यक आहे, तशा निवडणूक आयोगाच्या स्पष्ट सूचना आहेत. मतदान यंत्र ठेवलेले गोडाऊन उघडण्याच्या वेळेस आणि बंद करण्याच्या वेळेस राजकीय पक्षाचे स्थानिक प्रतिनिधी यांना आमंत्रित केले जाते. ईव्हीएम मशीन्स त्यांच्या समक्ष उघडून सीलबंद करण्याची कार्यवाही केली जाते. यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्फत व्हिडिओ शुटींग देखील केली जाते.

आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वी निवडणुकीची तयारी म्हणुन जिल्हास्तरावर ईव्हीएम मशिन्स उपलब्ध झाल्यानंतर कंट्रोल युनिट, व्हिव्हिपॅट आणि बॅलेट युनिट यांची संख्या निश्र्चित करुन निवडणुकीसाठी किती मशिन्स आवश्यक आहेत तेवढ्या प्रमाणात उपलब्धता निश्र्चित केली आते.

'फस्ट लेव्हल चेक' म्हणजे प्रत्येक मशिनची तपासणी करुन ते चालू अवस्थेत आहे की नाही, त्यामध्ये बिघाड आहे काय?, त्यांची सर्व बटने व्यवस्थित काम करत आहेत किंवा कसे? यांची तपासणी केली जाते. ही तपासणी भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड ह्या केंद्र शासनाच्या संस्थेचे अभियंते करत असतात. या तपासणीच्या वेळेस जिल्हा पातळीवर राजकीय पक्षाचे स्थानिक प्रतिनिधी यांना निमंत्रित केले जाते. त्यांच्या समक्ष तपासणीची कार्यवाही पूर्ण करुन मॉकपोल ही प्रक्रिया राबविण्याकरिता राजकीय पक्षांचे प्रतिनिधी सहभागी होतात. त्यावर अल्फा, बिटा अशा चिन्हांचा उपयोग करुन एका चिन्हाचे बटन दाबले तर दुसऱ्या चिन्हाची प्रिंट स्लिप निघत नाही याबाबत तपासणी करुन स्थानिक राजकीय प्रतिनिधींची खात्री झाल्यावर ते मशिन प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेसाठी तयार ठेवले जाते. मॉकपोल झाल्यावर राजकीय पक्षांसमक्ष सर्व मशिन्स गोडाऊन मध्ये सीलबंद ठेवली जातात.

महाराष्ट्र राज्यामध्ये 'फस्ट लेव्हल चेक' प्रक्रिया १ ऑगस्टपासून राबविण्यात आली असून मशिन्स सीलबंद करुन ठेवण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांचेशी चर्चा करुन त्याच्या उपस्थितीत प्रक्रिया पूर्ण केली जाते. या प्रक्रियेचे व्हिडिओ शुटींग करुन जतन करुन ठेवण्यात आलेले आहे. महाराष्ट्र राज्यात राजकीय पक्षांनी स्थानिक प्रतिनिधींमार्फत 'एफएससी' प्रक्रियेत सहभाग नोंदविला आहे.

'एफएससी' ओके असे स्टीकर लावलेल्या मशिन्सच्या गोडावून मधील एकूण मतदान केंद्र संख्येच्या ५ टक्के मशिन्स प्रशिक्षण आणि जनजागृतीसाठी वापरण्यात आल्या आहेत. जनजागृती कामासाठी ९ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर असा कालावधी होता. त्यानंतर मतदान अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणामध्ये मतदान प्रक्रिया प्रात्यक्षिक करण्यासाठी त्याच मशिन्स उपयोगात आणल्या जात आहेत. या मशिन्स प्रत्यक्ष निवडणुकीकरिता वापरल्या जाणार नाहीत.

त्यानंतर कमिशनिंग प्रक्रियेवेळी मशिन्सची सिंबॉल लोडिंग ही प्रक्रिया केली जाते. यासाठी दि.१० नोव्हेंबरपासून वेळापत्रक निश्र्चित करण्यात आले आहे आणि अशाप्रकारे कमिशनिंग पुढील ४ ते ५ दिवसात पूर्ण होईल. या संपूर्ण प्रक्रियेसाठी राजकीय पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींना निमंत्रित करुन त्यांच्या समक्ष कमिशनिंग केले जाते. मॉकपोलमुळे तयार होणाऱ्या 'व्हीव्हीपॅट' च्या वोटर स्लीप एकत्रित करुन त्याची विल्हेवाट लावली जाते. स्थानिक राजकीय पक्षाचे प्रतिनिधी समक्ष मतदानासाठी सिध्द असलेली सर्व मशिन्स कडेकोट बंदोबस्तात गोडाऊनमध्ये ठेवले जातात.

मतदान अधिकाऱ्यांच्या यादीचे निवडणूक आयोगाच्या परराज्यातील निरीक्षकांच्या उपस्थितीमध्ये सरमिसळीकरण (िरपवोळीरींळेप) केले जाते. त्यामुळे कोणत्या कर्मचाऱ्यास कोणत्या मतदान केंद्रावर निवडणुकीच्या कामासाठी जावे लागणार हे मतदान केंद्रावर जाण्यास पथके निघतात तेव्हाच कळते. त्याचप्रमाणे मतदान केंद्रासाठी कंट्रोल युनिट, 'व्हीव्हीपॅट', बॅलेट युनिट यांचे सरमिसळीकरण (िरपवोळरींळेप) होते आणि कोणत्या मतदान केंद्रावर कोणकोणत्या कर्मचाऱ्याजवळ कोणते मशिन्स जाणार यांचे संगणकाद्वारे वाटप होते. ही प्रक्रिया राजकीय पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींसमोर केली जाते व त्याबाबतचे इतिवृत्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या स्वाक्षरीसह जतन केली जाते. कोणत्या नंबरचे कोणते मशिन कोणत्या मतदान केंद्रावर जाणार त्याची यादी उमेदवारांना दिली जाते.

मतदान यंत्र संच घेऊन मतदान पथक मतदान केंद्रावर जायला निघतात, तेव्हा राजकीय पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींसमोर गोडाऊन उघडले जाते आणि सरमिसळीकरण (िरपवोळरींळेप) नुसार तिन्ही मशिन्स मतदान अधिकाऱ्यांच्या पथकाकडे सुपुर्द केली जातात. प्रत्यक्ष मतदान सुरु होण्याच्या आधी मतदान केंद्रावर उमेदवार किंवा उमेदवाराचे मतदान प्रतिनिधी यांच्यासमोर 'मॉकपोल' घेतला जातो. मशिन्स व्यवस्थित चालू आहेत की नाही याची खात्री मतदान प्रतिनिधी यांना पटल्यावर प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात केली जाते. मतदानाच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये मतदानाच्या गोपनीयतेचा भाग वगळून मतदान अधिकारी यांची सर्व कामे प्रत्येक मतदान केंद्रात उमेदवाराच्या प्रतिनिधी समक्ष घडतात.

मतदान संपल्यावर तिन्ही मशिनचा तपशील मतदान प्रतिनिधी समक्ष तपासला जातो व मशिन्स सीलबंद केली जातात. मतदान यंत्रांच्या वाहतुकीदरम्यान उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी वाहनाचे सिलिंग स्वत: पाहु शकतात. सिलिंग करणे अथवा उघडणे या प्रक्रियेदरम्यान व्हिडिओ शुटींग देखील केली जाते.

मतदानाच्या वेळेस देखील मशिन्स उघडणे व बंद करतेवेळेस उमेदवाराचे स्थानिक प्रतिनिधी उपस्थित असतात. त्यांच्या उपस्थितीबाबत मतदान यंत्रावरील लावण्यात येणाऱ्या स्लीपवर ते स्वाक्षरी करु शकतात.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे आणि जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या पातळीवर उमेदवार आणि राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्याशी बैठका वेळोवेळी घेण्यात येतात. सदर बैठकीमध्ये निवडणूक प्रक्रियेसंबंधी माहिती दिली जाते आणि शंकांचे निरसन केले जाते.

आपल्या महाराष्ट्र राज्याला शांततापूर्ण निवडणूक आणि मतदान प्रक्रियेची सवय आहे. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार आणि संबंधित सर्व घटकांचा सहभाग याबाबत प्रत्येक टप्प्यावर खबरदारी घेतली जाते. महाराष्ट्र राज्यात होणाऱ्या निवडणुकांना गौरवशाली परंपरा असल्याने सध्याची विधानसभा निवडणूक प्रक्रिया देखील शांततेने पार पडेल अशी अपेक्षा आणि खात्री आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongoan Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### आव्हाडांच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे मोठ्या शक्ती प्रदर्शनात उद्घाटन




दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : सलग चौथ्यांदा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड हे कळवा मुंब्रा विधानसभेच्या उमेदवारीला सामोरे जात आहेत.. कळव्यात मोठ्या प्रमाणात शक्ती प्रदर्शन करत जितेंद्र आव्हाड यांच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले यावेळी मोठ्या संख्येने महाविकास आघाडी मधील कार्यकर्ते व नगरसेवक उपस्थित होते.. उद्धव ठाकरेंपासून सर्वांचे फोन टॅप केले होते.. नाना पटोलेचे नाव अमजद खान ठेवलं होतं त्यांच्यापुढे स्मगलर लिहिलं होतं आणि नंबर नाना पटोलेंचा नाना पटोले यांचा नंबर ट्रॅप केला होता सर्व माहिती मीच पोलीस कमिशनर यांच्याकडून आणली अशा सतरा महत्त्वपूर्ण महाराष्ट्रातील लोक होती त्यांची बीजेपीच्या सांगण्यावरून फोन टॅपिंग केली होती त्यातील महाराष्ट्रातील सर्वच प्रमुख नेते होते मी ती यादी वाचली आहे राजकारणात एवढ्या हिंन दर्जाचं काम कधी झालं नव्हतं असा खळबळ जनक आरोप यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी भारतीय जनता पक्षावर केला आहे..

### मुक्ताईनगरातील उमेदवारांना 'झेड प्लस' सुरक्षा द्या एकनाथ खडसे



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : मुक्ताईनगरातील अपक्ष उमेदवार विनोद सोनवणे यांच्यावर झालेला गोळीबार ही गंभीर बाब असून येथील सर्व उमेदवारांना 'झेड प्लस' सुरक्षा द्यावी !'' अशी मागणी आमदार एकनाथराव खडसे यांनी केली. ते आज पत्रकारांशी बोलत होते. गेल्या दहा पाच वर्षांमध्ये मुक्ताईनगर तालुक्यामध्ये गुंडगिरी वाढलेली आहे, प्रत्येक गावामध्ये दहा पाच गुण निर्माण झाले आहेत तेही पोलिसांच्या संरक्षणामुळे, त्याचा परिणामच आज या उमेदवारावरती गोळीबार झाला यामुळे मुक्ताईनगर तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था किती बिघडली आहे हे दिसून येत आहे अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी ज्येष्ठ नेते एकनाथराव खडसे यांनी दिली आहे.

### अपक्ष उमेदवार विनोद सोनवणे यांच्या गाडीवर गोळीबार, पोलिसांकडे तक्रार दाखल, बोदवड पोलिसांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** :मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार विनोद सोनवणे हे आज बोदवड तालुक्यातील राजोरा या ठिकाणी प्रचारासाठी तात्यासह निघाले होते यांच्या गाडीवरती अन्याय गोळीबार केल्याची तक्रार बोदवड पोलीस स्टेशनला दाखल झाले आहे.मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार विनोद सोनवणे हे आज बुधवार तालुक्यातील राजोरा या ठिकाणी त्यांच्या प्राचार्यांच्या आयोजन करण्यात आले होते त्यावेळी राजुरा येथे पोहोचत असताना त्यांच्या ताब्यावरती आज्ञा तीसमाने गोळीबार केला त्याची तक्रार बोदवड पोलीस स्टेशनला दाखल करण्यात आली आहे अशी माहिती पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अरविंद भोळे यांनी दिली आहे

### 'लापता लेडीज'नंतर हा चित्रपटही ठरला ऑस्कर २०२५ साठी पात्र, कान्समध्ये फडकवला झेंडा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** ९७ व्या ऑस्कर अकादमी पुरस्कार २०२५ मध्ये भारतीय चित्रपटांचा दबदबा तयार होत आहे. अलीकडेच, आमिर खानची माजी पत्नी किरण राव दिग्दर्शित 'लापता लेडीज' या सोशल ड्रामा चित्रपटाची निवड करण्यात आली होती. त्या पाठोपाठ आता 'सनफ्लॉवर्स वेअर द फर्स्ट्‌ट वन्स टू नो' हा लघुपट ऑस्कर २०२५ साठी जाणर आहे. 'सनफ्लॉवर्स वेअर द फर्स्ट्‌ट वन्स टू नो' ने शेवटचा कान फिल्म फेस्टिव्हल २०२४ विजेता ठरला होता. आता कन्नड लघुपट ऑस्कर २०२५ साठी पात्र ठरला आहे.

# ग्रामदेवता बालाजीचे दर्शन घेऊन महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचाराला प्रारंभ

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** :'परिवर्तनाचा वारकरी, जनसामान्यांचा सेवेकरी' हे ब्रीद घेउन उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे उमेदवार सिध्दार्थ खरात यांचा परिवर्तन दौरा मेहकर विधानसभा मतदारसंघातील गावागावात सुरू आहे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे उमेदवार सिद्धार्थ खरात व त्यांचे सहकारी मतदार संघ पिंजून काढत आहेत .मेहकर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ रामभाऊ खरात यांच्या प्रचार कार्याला मंगळवारपासून सुरुवात झाली आहे.दि. ५ नोव्हेंबर रोजी






सकाळी ठीक ७:३० वाजता महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थित प्रचाराचा नारळ फोडण्यात आला आहे. प्राचाराच्या सुरुवातीला सिध्दार्थ खरात यांनी श्री शारंगधर बालाजी यांचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर पंच पीर बाबा दर्गा, छत्रपती शिवाजी महाराज, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना माल्यार्पण करून श्री गजानन महाराज यांचे दर्शन घेऊन गावांचा प्रचार दौरास प्रारंभ केला. दरम्यान, खरात यांनी पंचपीर बाबांच्या दर्ग्यावर चादर चढवली आणि त्यांचे आशीर्वाद घेतले. शेवटी श्री संत गजानन महाराज यांच्या तीर्थक्षेत्री जाऊन दर्शन आणि आशीर्वाद घेऊन, महाविकास आघाडीच्या मान्यवर नेत्यांच्या हस्ते प्रचाराचा नारळ फोडून, गावभेट आणि परिवर्तन दौरा सुरू केला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य काँग्रेसचे सरचिटणीस शाम उमाळकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण घुमरे, काँग्रेसचे विधानसभा नेते ड. अनंत वानखेडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे दत्ता घनवट, तालुका अध्यक्ष काँग्रेस देवानंद पवार, नंदकिशोर बोरे, शिवसेना तालुका प्रमुख निंबाजी पांडव, नाजिम कुरेशी, नारायण बळी, संजय वडतकर, वसंतराव देशमुख, ड. विजय मोरे, शैलेश बावस्कर, ड. गजानन लांडगे, सुखदेव ढाकरके, भागवत बोरकर, विनायक राव टाले, सतीश ताजने, छोटू गवळी, युनूस पटेल, रमजान चौधरी, बाबू परसुवाले तसेच महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## राहुल गांधींची संविधान सन्मान संमेलन, मीडियाला नो एन्ट्री,फडणवीस-दरेकारांचा हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** :नागपुरातील राहुल गांधी यांच्या संविधान सन्मान संमेलन कार्यक्रमात प्रसार माध्यमांना बंदी असणार आहे. बुधवारी ओबीसी युवा अधिकार मंचतर्फे लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधीं यांचं 'संविधान सन्मान संमेलन' कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. संविधान, अभिव्यक्ती स्वातंर्त्य आणि प्रसार माध्यमांच्या स्वातंर्त्यावर कायम बोलणाऱ्या राहुल गांधींच्या या कार्यक्रमात प्रसार माध्यमांना प्रवेश नाकारण्यात आल्याने



चर्चांना उधाण आलं आहे.

जाहिरात

यावरून आता भाजपनेही टीका केली. काँग्रेसकडूनच संविधानातील मूल्यांची हत्या सुरू असल्याचा आरोप भाजपने केलाय. दरम्यान, - या संम `लनात विदर्भातील वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी, सामाजिक संघटनांचे प्रमुख सहभागी होणार आहेत.राहुल गांधी उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. राहुल गांधी यांच्या व्यतिरिक्त अनेक बुद्धिजीवी या चर्चेत सहभागी होणार आहेत.

देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

नागपुरातील संविधान सभा ही राहुल गांधी संविधानाच्या साठी नाही तर मतांच्या साठी घेत असल्याने माध्यमांची राहुल गांधींना भीती वाटत असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

जाहिरात

प्रवीण दरेकर काय म्हणाले?

भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी देखील घणाघात केली आहे. मुस्कटदाबी करणं हा वारसा घेऊन राहुल गांधी चालले आहेत. संविधान संमेलन असेल तर तुमच्या भावना लोकांपर्यत पोहोचवणं गरजेचं आहे. संम `लनात विद्धवंसक प्लॅनिंग किंवा नॅरेटिव्ह सेट करण्याचं प्लॅनिंग असेल त्यामुळे मीडियाला बंदी घालण्यात आली असावी अशी टीका केली आहे.

## परस्पर पाठिंबा जाहीर करणाऱ्यांना तंबी, मनसेचा पदाधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**पुणे/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवित असतानाही मनसेकडून स्थानिक पातळीवर काही अपक्ष आणि अन्य पक्षांच्या अधिकृत उमेदवारांना पाठिंबा देण्यात आल्याचे पुढे आले आहे. त्याची दखल पक्षाच्या नेत्यांनी घेतली असून, परस्पर असे निर्णय जाहीर करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. विधानसभा निवडणूक मनसेकडून स्वबळावर लढविली जाणार आहे. त्यानुसार पुण्यातील चार मतदारसंघांसह राज्यातील अनेक मतदारसंघांत मनसेकडून उमेदवार देण्यात आले आहेत.

## इच्छादेवी चौकात गॅस सिलेंडरच्या स्फोटात १० जण गंभीर जखमी तर दोन वाहने जळून खाक



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : जळगाव शहरातील इच्छादेवी चौकात चारचाकी वाहनामध्ये घरगुती गॅस भरत असताना अचानक गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याने उभी असलेली चारचाकी वाहनासह एक दुचाकी जळून खाक झाले असून जवळच उभे असलेले व वाहनात बसलेले एकुण १० जण गंभीर भाजले गेल्याची घटना मंगळवारी ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घडली आहे. जखमींना तातडीने जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. दरम्यान दोन अग्निशमन बंबाच्या मदतीने ही आग आटोक्यात आणण्यात आली. यासंदर्भात मिळालेली माहिती अशी की, जळगाव शहरातील इच्छादेवी चौकातील एमआयडीसी पोलीस चौकीच्या बाजूला असलेल्या एका पत्राच्या शेडमध्ये वाहनांमध्ये घरगुती गॅस भरत असताना अचानकपणे गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याने भीषण आग लागली. या आगीत एकुण १० जण गंभीररित्या भाजले गेले तर चारचाकी वाहन क्रमांक (एमएच १५ बीएक्स २८१२ आणि एका दुचाकीने पेट घेतल्याने दोन्ही वाहने जळून खाक झाली आहे. दरम्यान या घटनेची माहिती मिळाल्यानंतर जळगाव महानगरपालिकेचे दोन अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाले व ही आग आटोक्यात आणण्यात आली, या भीषण आगीत भाजले गेलेल्या जखमींना तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## रोहिणी खडसे यांनी बोदवड पोलीस स्टेशन मध्ये पोहोचत भ्याड हल्ल्याचा केला निषेध

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : मुक्ताईनगर विधानसभेचे अपक्ष उमेदवार विनोद सोनवणे यांनी आज प्रचाराचा शुभारंभ केला आणि बोदवड तालुक्यातील राजुरा येथे प्रचारासाठी जात असताना त्यांच्यावरती अज्ञात इसमाने गोळीबार केला याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष आणि मुक्ताईनगर विधानसभेच्या उमेदवार रोहिणी खडसे यांनी बोदवड पोलीस स्टेशनला भेट दिली आणि निषेध व्यक्त केला. विनोद सोनवणे यांच्या ताफ्यावरती आज अज्ञात इसमाने बोदवड तालुक्यातील राजुरा येथे गोळीबार केला, या घटनेमुळे बोदवड पोलीस



स्टेशनला नागरिकांनी एकच गर्दी केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार रोहिणी खडसे यांनी बोदवड पोलीस स्टेशनला भेट दिली आणि घटनेची माहिती जाणून घेतली पत्रकारांशी संवाद साधताना त्या म्हणाल्या की तात्काळ आरोपीला अटक करून त्यावर कठोर कारवाई करा आणि प्रत्येक उमेदवाराला संरक्षण द्या तसेच त्यांनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेधही व्यक्त केला. अशा हल्लयापाठचा हेतू नेमका काय याची देखील कसून चौकशी करण्याची मागणी रोहिणी खडसे यांनी यावेळेस केली आहे.

## कन्हैयानगर चेकपोस्टवर पोलिसांनी वाहनात पकडली १४ लाखाची रोख रक्कम

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने पोलीस प्रशासन सज्ज झाले असून शहरातील चारही बाजूने नाकाबंदी करण्यात येत आहे. आज चंदनझीरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक सम्राटसिंग राजपूत यांनी माध्यमांशी संवाद साधत रोख रक्कम जप्ती बाबत माहिती दिली. दिनांक ४ सोमवार रोजी रात्री नऊ वाजेच्या सुमारास कन्हैयानगर येथे नाकाबंदी दरम्यान गाड्या चेक करत असताना गाडी क्र. **MH.21 V 9290** इनोवा ही गाडी पोलीसांनी चेक केली असता गाडी मध्ये बसलेले गौतम जैन यांना गाडी चेक करण्याबाबत सांगून त्यांची गाडी चेक केली असता वाहनामध्ये पाठीमागील डीकीत पैसे बंडल असलेली थैली आढळून आली. त्यामध्ये १४,१५३००/- रु. रोख रक्कम आढळून आल्याने पोलिसांनी **SST** पथक प्रमुख **S.D** सपकाळ यांना फोन करुन बोलवून घेतले. सापडलेले पैसे पोलीस ठाणे चंदनझीरा येथे जप्त करण्यात आले. रोख रकमे बाबत विचारपूस केली असता सदरील रक्कम व्यवसायाची असल्याचे गौतम जैन यांनी सांगितले. संपूर्ण रकमेचे बिल किंवा पावत्या आणण्यास पोलिसांनी सांगितले असता दुसऱ्या दिवशी एक वाजेपर्यंत त्यांनी बिल किंवा पावत्या जमा केल्या नसल्याचे पोलीस निरीक्षक सम्राटसिंग राजपूत यांनी सांगितले आहे.



# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४; मतदारांनी निर्भयपणे मतदानाचे हक्क बजाविण्याचे आवाहन

## जिल्ह्यात २ हजार २८८ मतदान केंद्र, २१ लाख ३४ हजार मतदार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी**: विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणेची सज्जता असून मतदारांनी निर्भयपणे आपल्या मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हा निवडणुक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व निवडणूक निरिक्षक सामान्य स्मिता सभरवाल, नरेश झा, सिमा सरकार व पोलीस निवडणूक निरिक्षक गुरमीतसिंग चौहान यांनी आज पत्रकार परिषदेत केले.



जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदारसंघातील २ हजार २८८ मतदान केंद्रांवर २० नोव्हेंबरला मतदान होणार असून सुमारे २१ लाख ३४ हजार ५०० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्हा प्रशासनाचे लक्ष्य मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी असून यासाठी मतदारांनीही प्रशासनाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत अधिकाधिक संख्येने मतदान करावे. तसेच भारत निवडणूक आयोगाने मतदारांच्या सुविधेसाठी विविध मोबाईल प सुरु केलेल आहेत. इनकोअर, सुविधाप, सक्षम प, केवायसी प, सिव्हीजील, व्होटर टर्नआऊट पचा समावेश आहे. वरील सर्व प मतदारांच्या सुविधेसाठी असून पारदर्शक व भितीमुक्त निवडणूक पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. तसेच निवडणूक संदर्भातील तक्रारीसाठी निवडणूक निरिक्षक यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी व निवडणूक निरिक्षक यांनी केले. यावेळी पोलीस अधिक्षक विश्र्व पानसरे, अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात २१ लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार : दि. ३० ऑक्टोंबर २०२४ रोजीच्या अंतिम मतदार यादीनुसार जिल्ह्यातील मतदारांची संख्या २१ लक्ष ३४ हजार ५०० असून यामध्ये पुरुष मतदार ११ लक्ष ९ हजार ७९१, महिला मतदार १० लक्ष २४ हजार ६७१ तर तृतीयपंथी मतदार ३८ आहे. विधानसभा मतदार संघनिहाय मतदारांची संख्या याप्रमाणे : २१–मलकापूर विधानसभा मतदार संघात पुरुष मतदार १ लक्ष ५० हजार ५६, महिला मतदार १ लक्ष ३८ हजार ३२६ तर तृतीयपंथी ६ असे एकूण २ लक्ष ८८ हजार ३८५ मतदार आहेत. २२– बुलढाणा विधानसभा मतदार संघात पुरुष मतदार १ लक्ष ५९ हजार ४५२, महिला मतदार १ लक्ष ४७ हजार ६३८ तर तृतीयपंथी १६ असे एकूण ३ लक्ष ७ हजार १०६ मतदार आहेत. २३– चिखली विधानसभा मतदार संघात पुरुष मतदार १ लक्ष ५७ हजार १७०, महिला मतदार १ लक्ष ४८ हजार ५४६ तर तृतीयपंथी २ असे एकूण ३ लक्ष ५ हजार ७१८ मतदार आहेत. २४–सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघात पुरुष मतदार १ लक्ष ६८ हजार ६०१, महिला मतदार १ लक्ष ५४ हजार ३९३ तर तृतीयपंथी १ असे एकूण ३ लक्ष २२ हजार ९९५ मतदार आहेत. २५–मेहकर विधानसभा मतदार संघात पुरुष मतदार १ लक्ष ५९ हजार ३७८, महिला मतदार १ लक्ष ४६ हजार ५७८ तर तृतीयपंथी ४ असे एकूण ३ लक्ष ५ हजार ९६० मतदार आहेत.२६– खामगांव विधानसभा मतदार संघात पुरुष मतदार १ लक्ष ५५ हजार ६३२, महिला मतदार १ लक्ष ४२ हजार २८५ तर तृतीयपंथी ५ असे एकूण २ लक्ष ९७ हजार ९२२ मतदार आहेत. तर २७–जळगाव जामोद विधानसभा मतदार संघात पुरुष मतदार १ लक्ष ५९ हजार ५०५, महिला मतदार १ लक्ष ४६ हजार ९०५ तर तृतीयपंथी ४ असे एकूण ३ लक्ष ६ हजार ४१४ मतदार आहेत.

जिल्ह्यात २ हजार २२८ मतदान केंद्र : जिल्हयात लोकसभेसाठी २२६५ मतदान केंद्र होती.यात २३ नविन मतदान केंद्रांची वाढ होऊन विधानसभा निवडणूक २०२४ साठी जिल्ह्यामध्ये २२८८ मतदान केंद्र आहे. यामध्ये मलकापूर येथे ३०५, बुलढाणा येथे ३३७, चिखली ३१७, सिंदखेड राजा ३४०, मेहकर ३५०, खामगांव ३२२ तर जळगाव जामोद येथे ३१७ असे एकूण २ हजार २२८ मतदान केंद्र आहे. एकूण मतदान केंद्राच्या ५० टक्के मतदान केंद्रावर वेब कॉस्टींग केल्या जाणार असल्याची माहिती यावेळी दिली.

जिल्ह्यात ११५ उमेदवारांमध्ये लढत तर ७२ उमेदवारांची माघार : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील सातही मतदारसंघात नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी ७२ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता ११५ उमेदवारांमध्ये निवडणूकीची लढत होणार आहे. मलकापूर येथे १५, बुलढाणा येथे १३, चिखली येथे २४, सिंदखेड राजा येथे १७, मेहकर येथे १९, खामगांव येथे १८ व जळगांव जामोद येथे ९ असे एकूण ११५ उमेदवारांमध्ये लढत होणार आहे. तसेच नामनिर्दिष्ट उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले, ते याप्रमाणे : मलकापूर येथे ७, बुलढाणा येथे ८, चिखली येथे १८, सिंदखेड राजा येथे १८, मेहकर येथे ११, खामगांव येथे ४ व जळगांव जामोद येथे ६ असे एकूण ७२ उमेदवारांचे नामनिर्देशन उमेदवारी मागे घेतले आहेत.

सोशल मीडियावर राहणार विशेष लक्ष : सोशल मीडिया, फेक न्यूजवर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. मतदानाच्या काळात सोशल मीडियावर प्रसारित होणारे, गैरसमज पसरविणारे संदेश व इतर घटनांवर लक्ष ठेवून अशा घटनांचे त्वरीत खंडन करण्याची व कारवाई करण्याची खबरदारी घेणार असल्याचे सांगितले.

मतदारांनो, व्होटर हेल्पलाईन पवर नाव शोधा : व्होटर हेल्पलाईन पवर मतदारांना आपले नाव शोधता येणार आहे. या पच्या माध्यमातून मतदारांनी मतदानासाठी आपले नाव शोधून मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

ओळखीसाठी १२ पुरावे ग्राह्य : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीकरीता मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार फोटो ओळख पत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरले आहेत. यापैकी कोणताही एक ओळख पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येणार आहे.

आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक किंवा पोस्ट ऑफिसने जारी केलेले छायाचित्र असलेले पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांचेद्वारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, छायाचित्रासह पेन्शन दस्तऐवज, केंद्र/राज्य सरकार/सार्वजनिक उपक्रम/ पब्लिक लिमिटेड कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदार/आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र असे एकुण १२ कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

दिव्यांग व वयोवृद्धासाठी गृहमतदान : दिव्यांग व ८५ पेक्षा जास्त वयोमानातील मतदारांन निवडणूकीमध्ये मतदान करता यावे यासाठी भारत निवडणूक आयोगाने होम वोटींगची सुविधा देण्यात आली आहे.त्यानुसार ३ हजार १०७ जेष्ठ नागरिक, ६७४ दिव्यांग असे एकूण ३ हजार ७८१ जेष्ठ नागरीक व दिव्यांगाचे घरपोच मतदान करणे सोईचे होण्यासाठी १६० पथकामार्फत दि. १४, १५ व १६ नोव्हेंबर २०२४ दरम्यान गृह मतदान करुन घेतले जाणार आहे.

भारत निवडणूक आयोगाने मतदारांच्या सुविधेसाठी इनकोअर, सुविधाप, सक्षम प, केवायसी प, सिव्हीजील, व्होटर टर्नआऊट प उपलब्ध करुन दिले आहे. हे सर्व प मतदारांच्या सुविधेसाठी असून पारदर्शक निवडणूक पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.

## विविध वृत्त...

### अमेरीकीतूनही माणसं बोलावले तर त्याचा फरक पडणार, तर खासदार, आमदार असलेल्या मतदारसंघात सभा घ्याव्या लागतात हेच मोठी चपराक आहे- बच्चू कडू




दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** : विदर्भात महाविकास आघाडी आणि महायुतीच्या बड्या नेत्यांच्या सभा होणारेय. याच सभेच्या अनुषंगाने प्रहारचे नेते बच्चू कडू यांची प्रतिक्रिया समोर आलीये.. होणाऱ्या सभा फक्त गर्दीसाठी असणारेये.. अधीही कित्येक सभा झाल्या, सर्वांनी त्याचे रिझल्ट पाहिले. लोकांचं ठरल आहे...तर अमेरीकीतूनही माणसं बोलावले तर त्याचा फरक पडणार नसल्याचे बच्चू कडू म्हणतात... दरम्यान खासदार, आमदार असलेल्या मतदारसंघात सभा घ्यावे लागतात.. हेच मोठी चपराक असल्याचेही ते म्हटले.. ते अकोल्यात बोलत होते. दरम्यान, घरांदाज मराठाच्या दबावात जरांगेनी माघार घेतली आणि रयतेतील मराठ्यांचा बळी दिलाय, असे आंबेडकर म्हटले होते.. यावर कडू बोलतांना म्हटलेत निर्णय घेतांना चुका होतात.. आम्हीही चुकतो. मात्र जरांगेचा निर्णय बळी घेण्यासाठी आहे, असं म्हण चुकीचं असणारेये.. असेही कडू म्हणतात....!

### निवडणूक पार्श्वभूमीवर बुलढाणा पोलिसांचा रुट मार्च

**बुलडाणा/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीत कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये, यासाठी बुलढाणा पोलिस प्रशासना सज्ज झाले आहे. त्यासाठी तगडा पोलीस बंदोबस्त राहणार आहे. त्या अनुषंगाने आज बुलढाणा पोलीस व सीआरपी दलाच्या जवानांनी रूट मार्च काढला आहे. नागरिकांनी भयमुक्त वातावरणामध्ये मतदान करावे, कुठल्याही आमिषाला बळी पडू नये असे आवाहन पोलीस दलाच्या वतीने करण्यात आले आहे.



## नागापूर येथील नागरिकांनी केला शिवसेनेत प्रवेश

### आमदार संजय रायमुलकर यांच्या नेतृत्वावर विश्वास





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार संजय रायमुलकर यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून नागापूर येथील नागरिकांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.या प्रवेशामुळे मेहकर लोणार मतदार संघातील शिवसेना शिंदे गटाची ताकद वाढली आहे. मेहकर लोणार विधानसभा मतदार संघातील निवडणूक ही शिवसेना विरुद्ध शिवसेना तसेच वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार यांच्यामध्ये तिरंगी लढत होत आहे. त्यामुळे मतदारसंघात गुलाबी थंडीत राजकीय वातावरण चांगलेच तापत असून मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघातील उमेदवाराबाबत तर्क वितर्क लावले जात असताना नागापूर येथील नागरिकांनी तथा मेहकर मतदारसंघातील मतदारांनी आमदार संजय रायमुलकर यांच्या नेतृत्वावर यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून मेहकर तालुक्यातील नागापूर येथील गणेश धाबे,सै,नजीर, रामेश्र्वर खिल्लारी. किसना गायकवाड़ सै,तस्लीम, यांनी जाहिर प्रवेश केला केला आहे. यावेळी राजंय पळसकर, उपसरपंच सै,समीर सै,बशीर, उत्तम परमाळे. साहेबराव,गायकवाड़ यांची उपस्थिति होती. शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार आमदार संजय रायमुलकर यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून नागरिकांनी शिंदे शिवसेना गटात प्रवेश केल्याने आमदार संजय रायमुलकर यांची ताकद वाढली आहे...

### महायुतीचे उमेदवार डॉ. संजय कुटे यांनी फोडला प्रचाराचा नारळ

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** :बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार डॉ. संजय कुटे यांना पाचव्यांदा उमेदवारी मिळाली असून त्यांनी मतदारसंघातील तीर्थक्षेत्रांचे आशीर्वाद घेत प्रचाराचा नारळ फोडला आहे. तर मतदारसंघांमध्ये विविध प्रक्रिया उद्योग सिंचनाच्या माध्यमातून सुजलाम सुफलाम करणे, पर्यटन वाढवणे आणि या विकासाच्या माध्यमातूनच माझं राजकारण असते आणि मतदारसंघातील माता भगिनी कार्यकर्ते मिळून मला पाचव्यांदा विजय निश्र्चित मिळवून देतील अशी प्रतिक्रिया जळगाव जामोद मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार डॉ. संजय कुटे यांनी दिली आहे.

## सिंदखेड राजा मतदार संघाची आढावा बैठक संपन्न

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा:** केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता निवडणूक कार्यक्रम घोषित केला असून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघातील सर्व उमेदवार तसेच त्यांचे प्रतिनिधी यांची दि.५ नोव्हेंबर २०२४ रोजी आढावा बैठक निवडणूक विभाग तहसील कार्यालय सिंदखेडराजा येथे निवडणूक खर्च निरीक्षक दानिश अब्दुल्ला यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.






या आढवा बैठकीमध्ये दानिश अब्दुल्ला यांनी उमेदवार तसेच प्रतिनिधी यांना उमेदवारांना खर्चाची मर्यादा ४० लाख रुपये आहे असे सांगितले. प्रत्येकाने निवडणूक प्रचार, रॅली, सभा,जेवण, चहा पाणी याबाबतचा सर्व खर्च हा निवडणुकीबाबत उघडण्यात आलेल्या नवीन खात्यामधून करणे अपेक्षित आहे. केलेल्या खर्चाचा हिशोब व्हाऊचर वर संकलित करून ठेवावा व तो अचूक स्वरूपातील खर्च नोडल अधिकारी यांच्याकडे प्रति दोन दिवसांनी सादर करावा. असे आआवाहन केले.

प्रचारामध्ये वापरलेल्या वाहनाचा दर हा आरटीओ कार्यालयाने दिलेल्या दरानुसारच असावा. १० हजार रुपयापर्यंत रोख व्यवहार हा उमेदवार करू शकतो. या सोबतच सोशल मीडियाद्वारे केलेला खर्च सुद्धा हिशोबात पकडला जाणार आहे. तसेच निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर प्रत्येक उमेदवाराने ३० दिवसाच्या आत प्रतिज्ञापत्रात आपला हिशोब सादर करणे आवश्यक आहे. सदर सभेमध्ये केलेले खर्च हे निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या दरानुसारच अपेक्षित आहे, अशा महत्त्वाच्या सूचना निवडणूक खर्च निरीक्षक दानिश अब्दुल्ला यांनी सर्व उमेदवारांना तसेच अधिकाऱ्यांना दिल्या.

या सभेचे आभार निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी मानले. या सभेला सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सिंदखेडराजा अजित दिवटे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा गटविकास अधिकारी सिंदखेड राजा मुकेश माहोर, निवडणूक नायब तहसीलदार मनोज सातव, निवडणुक नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रवीण घोटकर, प्रसार माध्यम नोडल अधिकारी अंकुश म्हस्के, संजय सोनुने तसेच इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक आचारसंहिता संदर्भात मार्गदर्शन करून आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन केले.